## महाराष्ट्र शासन

ई-मेलद्वारे

क्रमांक:- याचिका-६११५/प्र.क्र.६९/एस.डी.-१,
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- २६/१०/२०१७

प्रति,
शिक्षण संचालक (प्राथमिक),
महाराष्ट्र राज्य, पुणे

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार दुर्बल व वंचित घटकातील बालकांकरिता २५ टक्के राखीव जागांवर प्रवेशित पूर्व प्राथमिक विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत.
(मा.सर्वोच्च न्यायालय एस.एल.पी.क्र.-६६२१/२०१६ महाराष्ट्र शासन व इतर विरध्द उरण एज्युकेशन सोसायटी व इतर)

संदर्भ :- १) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.प्राशिसं/आरटीई ५२०/४४००, दि.०६/१०/२०१७
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, रायगड यांचे पत्र क्र.राजिप/ प्राथ.शिक्षण/ आस्था-२३/२०१६, दिनांक ०६/१०/२०१७

विषयांकित प्रकरणी आपल्या संदर्भ क्र.१ च्या पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, उरण एज्युकेशन सोसायटी व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर यांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार दुर्बल व वंचित घटकातील बालकांकरिता पूर्वप्राथमिक वर्गासाठी २५% राखीव जागांवर प्रवेशित विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती मिळण्याकरिता रिट पिटीशन क्र.२८००/२०१५ मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, मुंबई येथे दाखल केली होती. सदर याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दिनांक २८/४/२०१५ रोजी अंतिम आदेश दिला असून, त्यामध्ये ३ ते ६ वयोगटातील मुलांच्या पूर्व प्राथमिक शिक्षणाची शिक्षणाची जबाबदारी शासन नाकारु शकत नाही, त्यामुळे पूर्व प्राथमिक वर्गाचे २५ टक्के प्रवेशित बालकांचे शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती शासनाने करणे आवश्यक असल्याचे व याचिकाकर्त्याची विनंती मान्य करीत असल्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले होते.

२. मा.उच्च न्यायालयाने दिनांक २८/०४/२०१५ रोजी दिलेले आदेश शिक्षण हक्क कायदा २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (वंचित गटातील बालकांना व दुर्बल गटातील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश देण्याकरिता जागा राखून ठेवण्याची रीत) नियम, २०१२ यामधील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे विधि व न्याय विभागाच्या अभिप्रायास अनुसरुन विभागाने मा.सर्वोच्च न्यायालयात एस.एल.पी.क्र.६६२१/२०१६ दाखल केली होती. मा.सर्वोच्च न्यायालयात एस.एल.पी.क्र.-६६२१/२०१६ ची सुनावणी दिनांक १८/०९/२०१७ रोजी झाली असून, सदर सुनावणीमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.३०/०९/२०१७ पर्यंत याचिकाकर्ता क्रमांक-१ (उरण एज्युकेशन सोसायटी) च्या पूर्व प्राथमिक शाळेतील आर.टी.ई., २००९ अंतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशित वंचित व दुर्बल घटकांच्या बालकांच्या शैक्षणिक खर्चाची प्रतिपूर्ती करण्याकरिता किती रक्कम देणे आवश्यक आहे याची परिगणना करुन सदर रक्कम मुदत ठेवीच्या स्वरुपात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, मुंबई येथे आदेशाच्या दिनांकापासून सहा आठवडयांच्या आत जमा करण्याबाबत आदेश दिले आहेत. तसेच सदर आदेशान्वये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, मुंबई यांचे दि.२८/०४/२०१५ रोजीच्या आदेशास स्थगिती दिलेली आहे.

३. मा.सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक १८/०९/२०१७ रोजीच्या आदेशाचे अनुषंगाने उरण एज्युकेशन सोसायटीमार्फत सन २०१३-१४ ते सन २०१७-१८ या वर्षापर्यंत पूर्व प्राथमिक शिक्षणाकरिता आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेश दिलेल्या सर्व विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्तीची रक्कम रुपये ७३,००,११५/- (रुपये त्र्याहत्तर लक्ष एकशे पंधरा फक्त) मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, मुंबई येथे मुदत ठेवीच्या स्वरुपात जमा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

४. उपरोक्त रक्कम मा.उच्च न्यायालयात जमा करण्याकरिता शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर रक्कम मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विहित कालमर्यादेत जमा करण्याची व मा.न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

५. सदरची रक्कम पुढील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे:-

आ) अपीलाच्या वेळी शिक्षण हक्क कायदा २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा

शिक्षणाचा हक्क नियम, २०११ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (वंचित गटातील बालकांना व दुर्बल गटातील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश देण्याकरिता जागा राखून ठेवण्याची रीत) नियम, २०१२ तरतूदी विचारात घेवून विशेष सरकारी वकीला मार्फत शासनाची बाजू मा.सर्वोच्च न्यायालयापुढे मांडण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

ब) प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, मुंबई यांचे निर्णयाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात एस.एल.पी.क्र.६६२१/२०१६ दाखल करण्यात आली आहे, ही बाब रक्कम मुदत ठेवीच्या स्वरुपात जमा करताना लेखी स्वरुपात मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, मुंबई व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

क) मंजूर केलेली रक्कम हितसंबंधितानी योग्य त्या बँक हमी शिवाय उचलू नये किंवा मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार उचल करावी अशी लेखी विनंती शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मा.न्यायालयात करावी.

६. याबाबतीत होणारा खर्च हा मागणी क्र. "ई-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण- (०१) प्राथमिक शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्ग योजना, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक शिक्षण संस्थांना सहाय्य (०१) (१९) २५ टक्के विद्यार्थी कोटा प्रवेशांतर्गत शाळांना करावयाची प्रतिपूर्ती (२२०२H८७५)" या लेखाशीर्षाखालील सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात वितरित केलेल्या अखर्चित निधीमधून खर्ची टाकण्यात यावा.

७. वर उल्लेखिलेल्या लेखाशीर्षाखाली देण्यात आलेली मंजुरी ही अंतरिम आहे. जर मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या अपिलाचा अंतिम निकाल शासनाच्या बाजूने लागला तर या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम मा.उच्च न्यायालयातून काढून त्या रकमेचा भरणा "०२०२ शिक्षण कला, क्रिडा व संस्कृती ०१ सर्वसाधारण शिक्षण (०१) (०४) इतर बाबी (०२०२ ०३५८)" या लेखाशीर्षाखाली करण्यात यावा.

८. जर मा.सर्वोच्च न्यायालयाचा निकाल शासनाच्या विरुध्द लागला तर सदरहू रक्कम "०२०२ शिक्षण कला, क्रिडा व संस्कृती ०१ सर्वसाधारण शिक्षण (०१) (०४) इतर बाबी (०२०२ ०३५८)" या लेखाशीर्षाखाली जमा दर्शवून खर्च मागणी क्र."ई-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण- (०१) प्राथमिक शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्ग योजना, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी

स्थानिक शिक्षण संस्थांना सहाय्य (०१) (१९) २५ टक्के विद्यार्थी कोटा प्रवेशांतर्गत शाळांना करावयाची प्रतिपूर्ती (२२०२H८७५)" या लेखाशिर्षाखालील उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागवावा लागेल व त्या परिस्थितीत शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे हे आवश्यक त्या भारित रकमेच्या मंजुरीबाबतचा रीतसर प्रस्ताव सादर करतील.

९. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मा.सर्वोच्च न्यायालयातील एस.एल.पी.क्र.६६२१/२०१६ चा निकाल लागल्याबरोबर या प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास पाठवावा.

१०. उपरोक्त आदेश वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.९६६/व्यय-५, दि.१७/१०/२०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

(डॉ.सुवर्णा खरात)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. विभागीय शिक्षण उप सचांलक, मुंबई विभाग, मुंबई
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, रायगड
४. अर्थसंकल्प कार्यासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
५. निवड नस्ती, एसडी-१

(४)

**महाराष्ट्र शासन**
**प्राथमिक शिक्षण संचालनालय**
डॉ. ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत पुणे - ४११००१.
दुरध्वनी :-(०२०) २६१२१३९२
दुरध्वनी (०२० )२६१२१३९४
ई- मेल depbudget३३@gmail.com

क्र. प्राशिस/२५टक्केप्रतिपूर्ती/१७-१८/५२०/४८५३

दिनांक:- २६.१०.२०१७.

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे.

**विषय:- बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार दुर्बल व वंचित घटकातील बालकांकरीता २५ टक्के राखीव जागांवर प्रवेशित पूर्व प्राथमिक विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत.**

**संदर्भ :-** शासन पत्र क्र.याचिका-६११५/प्र.क्र.६९/एस.डी.-१, दिनांक २६.१०.२०१७.

महोदय,

विषयांकित प्रकरणी उरण एज्यूकेशन सोसायटी व इतर विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर यांनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार दुर्बल व वंचित घटकातील बालकांकरीता पूर्वप्राथमिक वर्गासाठी २५ टक्के जागांवर प्रवेशित विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती मिळण्याकरीता रिट पिटीशन क्र. २८००/२०१५ मा. उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई येथे दाखल केली होती. सदर याचिकेवर मा. उच्च न्यायालयाने दिनांक २८.०४.२०१५ रोजी अंतिम आदेश दिला असून, त्यामध्ये ३ ते ६ वयोगटातील मुलांच्या पूर्व प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शासन नाकारू शकत नाही, त्यामुळे पूर्व प्राथमिक वर्गाचे २५ टक्के प्रवेशित बालकांचे शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती शासनाने करणे आवश्यक असल्याचे व याचिकाकर्त्यांची विनंती मान्य करीत असल्याचे आदेश मा. उच्च न्यायालयाने दिले होते. मा. उच्च न्यायालयाने दिनांक २८.०४.२०१५ रोजी दिलेले आदेश शिक्षण हक्क कायदा २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (वंचित गटातील बालकांना व दुर्बल गटातील बालकांना प्राथमिक शिक्षणासाठी प्रवेश देण्याकरीता जागा राखून ठेवण्याची रीत) नियम, २०१२ यामधील तरतूदींशी विसंगत असल्यामुळे विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायास अनुसरून विभागाने मा. सर्वोच्च न्यायालयात एस.एल.पी.क्र. ६६२१/२०१६ दाखल केली होती. मा. सर्वाच्च न्यायालयात एस.एल.पी.क्र. ६६२१/२०१६ ची सुनावणी दिनांक १८.०९.२०१७ रोजी झाली असून, सदर सुनावणीमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३०.०९.२०१७ पर्यंत याचीकाकर्ता क्र.१ (उरण एज्यूकेशन सोसायटी) च्या पूर्व प्राथमिक शाळेतील आर.टी.ई, २००९ अंतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेशित वंचित व दुर्बल घटकांच्या बालकांच्या शैक्षणिक खर्चाची प्रतिपूर्ती करण्याकरीता किती रक्कम देणे आवश्यक आहे याची परिगणना करून सदर रक्कम मुदत ठेवीच्या स्वरूपात मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, मुंबई येथे आदेशाच्या दिनांकापासून सहा आठवडयांच्या आत जमा करणेबाबत आदेश दिलेले आहेत.

उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने शासनाने संदर्भीय पत्रान्वये उरण एज्यूकेशन सोसायटीमार्फत सन २०१३-१४ ते सन २०१७-१८ या वर्षापर्यंत पूर्व प्राथमिक शिक्षणाकरीता आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेश दिलेल्या सर्व विद्यार्थ्यांची शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्तीची रक्कम रूपये ७३,००,११५/- (रूपये त्र्याहत्तर लक्ष एकशे पंधरा फक्त) मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, मुंबई येथे मुदत ठेवीच्या स्वरूपात जमा करण्यास मान्यता दिलेली आहे.

याबाबतीत मागणी क्र. "ई-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण —(०१) प्राथमिक शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक शिक्षण संस्थांना सहाय्य (०१) (१९) २५ टक्के विद्यार्थी कोटा प्रवेशातंर्गत शाळांना करावयाची प्रतिपूर्ती (२२०२H८७५)" या लेखाशिर्षाखाली आपल्या जिल्हा परिषदेला सन २०१६-१७ मध्ये वितरीत केलेली रक्कम रू. ७,५१,६६,०००/- (रूपये सात कोटी एक्कावन्न लक्ष सहासष्ट हजार फक्त) मधून अखर्चीत राहीलेल्या निधीमधून खर्ची टाकण्यात येत आहे.

तरी रक्कम रू. ७३,००,११५/- (रूपये त्र्याहत्तर लक्ष एकशे पंधरा फक्त) मा. प्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या नावाने मुदत ठेवीच्या स्वरूपात जमा करून त्याचा अहवाल दोन दिवसात संचालनालयास सादर करण्याबाबत आपल्यास्तरावरून संबंधीतांना तात्काळ आदेश व्हावेत, ही विनंती.

**(सुनिल चौहान)**
शिक्षण संचालक,(प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

**प्रतः माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी-**

१) विभागीय शिक्षण उपसंचालक, विभाग, पुणे.
२) शिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे.

**प्रतः माहितीसाठी सविनय सादर-**

१) मा. आयुक्त (शिक्षण), आयुक्त (शिक्षण) कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
२) डॉ. सुवर्णा खरात, सहसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

(५)

**महाराष्ट्र शासन**
**प्राथमिक शिक्षण संचालनालय**
**डॉ. ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत पुणे - ४११००१.**
दुरध्वनी :-.(०२०) २६१२५८७४, दुरध्वनी (०२० )२६१२१३९४
फॅक्स (०२० )२६१२८१५७/२६१२५८७४ ई- मेल depmah@mail.com

ज्ञापन क्रमांक १

क्रमांक:आरटीई /२५टक्केअनु./५२०/२०१७/1554
दिनांक : २५.०३.२०१७.

31 MAR 2017

प्रति,
१) विभागीय शिक्षण उपसंचालक,
विभाग-मुंबई.
२) शिक्षणाधिकारी, (प्राथमिक)
जिल्हा परिषद, सर्व,
३) शिक्षण निरिक्षक,
दक्षिण, उत्तर व पश्चिम मुंबई.

**विषय:-२५ टक्के विद्यार्थी कोटा प्रवेशांतर्गत शाळांना करावयाची प्रतिपूर्ती (२२०२H८७५)३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर).**

**संदर्भ :-** शासन निर्णय क्रमांक : आरटीई-२०१६/प्र.क्र.१०/एस.डी.१, दि. २४ मार्च,२०१७.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये लेखासांकेतांक २२०२H८७५/३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीखाली २५ टक्के विद्यार्थी कोटा प्रवेशांतर्गत शाळांना करावयाची प्रतिपूर्ती केली जाते. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी लेखासांकेतांक २२०२H८७५/३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीखाली रक्कम रु. ८४,२०,०० हजार इतकी तरतुद मंजुर आहे. उपरोक्त संदर्भाधिन लेखासांकेतांक २२०२H८७५/३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीखाली रक्कम रू. २६,००,०० हजार इतकी तरतूद संगणक वितरण प्रणालीवर उपलब्ध आहे.

सोवत जोडलेल्या विवरणपत्रात उक्त शासन निर्णय व पत्र इ. अन्वये दिलेले आदेश व निर्देशानुसार बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत दुर्बल घटक व वंचित गटातील बालकांसाठी आरक्षित २५% प्रवेश सन २०१६-१७ या शैक्षणीक वर्षाचे वर्षनिहाय शुल्क प्रतिपर्तीसाठी एकूण रक्कम रू. ज्ञापन क्र. १ अन्वये माहे मार्च २०१७ मध्ये एकूण रक्कम रुपये २६,००,०० (रक्कम रुपये सव्वीस कोटी फक्त) इतकी रक्कम

वितरीत करण्यात येत आहे. सदरचे अनुदान हे शिक्षणाधिकारी, (प्राथमिक) जिल्हा परिषद सर्व यांनी केलेल्या आवश्यक अनुदानाच्या मागणीनूसार २५ टक्के विद्यार्थी कोटा प्रवेशांतर्गत शाळांना करावयाची प्रतिपूर्तीकरिता आवश्यक अनुदानाचा समावेश आहे. व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे २५ टक्के विद्यार्थी कोटा प्रवेशांतर्गत शाळांना करावयाची प्रतिपूर्तीकरिताचे अनुदान विभागीय शिक्षण उपसंचालक, विभाग मुंबई यांनी आहरित करून बृहन्मुंबई महानगरपालिकेला वितरीत करावे. जिल्हानिहाय मंजूर केलेली रक्कम खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावी.

मागणी क्र. ई-२, २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थाना सहाय्य (०१) (१९) २५ टक्के विद्यार्थी कोटा प्रवेशांतर्गत शाळांना करावयाची प्रतिपूर्ती (२२०२H८७५) सहाय्यक अनुदान. दत्तमत.

निकषपात्र सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी प्रतिपूर्ती रक्कम दि. १० ऑक्टोबर, २०११ च्या बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम, २०११ मधील भाग ४ मधील नियम ८ चे उपनियम २ नुसार शाळांचे आरटीई अंतर्गत आरक्षित २५% प्रवेश प्रतीपूर्तीसाठी स्वतंत्र ठेवावयाचे बँक खात्यामध्ये वर्ग (ट्रान्सफर) करण्यात यावी. **प्रतिपूर्तीची रक्कम कोणत्याही परिस्थितीमध्ये संबंधीत शाळेचे आरटीई प्रतिपूर्ती बाबतचे स्वतंत्र बँक खाती वर्ग करावी. इतर कोणत्याही बँक खाती वर्ग करण्यात येऊ नये.**

आरटीई अंतर्गत आरक्षित २५% प्रवेश प्रतिपूर्ती रक्कम शाळेचे स्वतंत्र बँक खाती वर्ग करताना दिनांक २४ मे, २०१२ च्या शासन अधिसुचनेतील परिच्छेद ७ व दिनांक १५ मार्च, २०१३ शासन अधिसुचनेतील परिच्छेद १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विहीत कार्यपध्दती, अटी-शर्ती व निकषांची खातरजमा करून प्रतीपूर्ती रक्कम वर्ग करण्यात यावी. तसेच, संबंधीत शाळेने आकारलेले प्रती विद्यार्थी प्रती वर्ष शुल्क व शासन निर्णयानुसार मंजूर प्रतीपूर्तीचा दर (कमाल मर्यादा) यापैकी जी रक्कम कमी असेल त्या प्रमाणे प्रतीपूर्ती रक्कम अदा करण्याची कार्यवाही करावी. सदर खर्चाची उपयोगीता प्रमाणपत्रे संचालनालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी. याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

वितरीत केलेल्या प्रतीपूर्ती अनुदानातील अनुदान शिल्लक राहिल्यास अथवा जिल्हयास अनुदानाची आवश्यकता नसल्यास सदर अनुदानाची रक्कम तात्काळ प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडे वर्ग करावी व या कार्यवाही पुष्ठयर्थ समर्पक तपशिल संचालनालयास विनाविलंब सादर करावा. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व नियम २०११ तसेच प्रस्तूत विषयी शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित अधिसुचना व शासन निर्णयामधील अटी-शर्ती, निर्देश व तरतूदींच्या अधीन राहूनच आरटीई अंतर्गतचे २५% प्रवेशांचे प्रतिपूर्ती करण्याबाबतची कार्यवाही करावी.

अधिनियमातील तरतूदीनुसार प्रतिपूर्ती बाबतची जबाबदारी आपली असल्याने याबाबत कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही याची आपण दक्षता घ्यावी. तसेच **विषयांकीत प्रकरणी अनुदानाचा मासिक खर्च अहवाल, उपयोगिता प्रमाणपत्र व वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास ई-मेलदवारे सादर करावा व त्याची एक प्रत पोस्टाद्वारे पाठवावी.**

सोबत जोडलेल्या विवरणपत्रात नमूद केलेल्या अनुदानाची रक्कम संबंधित खालील नमूद केलेल्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

१. ज्या उद्देशासाठी निधी/अनुदान मंजूर आहे त्या व्यतीरिक्त इतर उद्येशासाठी खर्च करता येणार नाही.

२. सदर खर्चाचा प्रगती अहवाल मासिक निधी विवरणपत्रानुसार संबंधीत अधिकाऱ्यांने दरमहा १० तारखेपर्यंत सादर करावा.

३. तरतुद वितरीत करतांना शासन हिश्याच्या मर्यादेत तरतुदी वितरीत कराव्यात. कोणत्याही परिस्थितीत जिल्हा परिषद फंडात आवश्यक रक्कम शिल्लक राहणार नाही याची दक्षता यावी.

६. अनुदान निर्धारणा अभावी तरतूद जास्त गेल्यास अथवा फंडात राहिल्यास तसेच त्या अनुषंगाने लेखा आक्षेप नोंदविला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

७. मागणी नोंदवितांना उपरोक्त सूचना लक्षात घेवून तसेच आवश्यक तेवढयाच रकमेची मागणी नोंदवावी. पुढील अनुदानासाठी मागणी पुरेशा कालावधीपूर्वी या संचालनालयाकडे सादर करणे आवश्यक आहे.

८. शिष्यवृत्ती, शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती इलेक्ट्रानिक्स क्लिअरन्स सिस्टीम (ECS) नेच अदा करण्यात यावी.

**(शरद गोसावी)**
शिक्षण उपसंचालक (प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**प्रत- माहितीस्तव सविनय सादर,**
मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.
**प्रत: माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी**
१) कोषागार अधिकारी, सर्व जिल्हे.
२) अधिदान व लेखाधिकारी, प्रशासकीय इमारत ए विंग, ड्राइव्ह इ थिएटर जवळ मारकुला संकुल वांद्रा, मुंबई.
३) मा.महालेखापाल, महाराष्ट्र मुंबई-१/नागपूर-२.
४) खर्चमेळ व अंदाज शाखा, मा. आयुक्त (शिक्षण) कार्यालय, बालभारती, पुणे.

ज्ञापन क्र. १

.आरटीई २५ टक्के प्रवेशांतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांचे शुल्क प्रतिपुर्ती सन २०१६-१७

(रक्कम रू. हजारात)

| अ.क्र. | जिल्हा | यापूर्वी वितरित्त तरतूद | या ज्ञापनाव्दारे वितरीत तरतूद | एकूण वित्तरित तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | बृहन्मुंबई म.न.पा. | ० | ४९१७ | ४९१७ |
| २ | बृहन्मुंबई उत्तर विभाग | ० | १९१ | १९१ |
| ३ | नवी मुंबई म.न.पा. | ० | १३५१ | १३५१ |
| | विभागीय शिक्षण उपसंचालक,मुंबई | ११६२ | ६४५९ | ७६२१ |
| ४ | रायगड | २६०६ | ४९१९ | ७५२५ |
| ५ | ठाणे | २८७० | ८७७० | ११६४० |
| ६ | पालघर | ० | ३५८० | ३५८० |
| ७ | पुणे | ३१८१४ | ४३३५२ | ७५१६६ |
| ८ | अहमदनगर | १०५२६ | १२३६८ | २२८९४ |
| ९ | सोलापूर | २५२० | २८३९ | ५३५९ |
| १० | नाशिक | ९५०९ | १०२५९ | १९७६८ |
| ११ | धुळे | १७०४ | ३०९१ | ४७९५ |
| १२ | जळगाव | २९७१ | ३९९९ | ६९७० |
| १३ | नंदुरबार | ० | १२७९ | १२७९ |
| १४ | कोल्हापूर | १३३०१ | १६७३७ | ३००३८ |
| १५ | सातारा | ३२३८ | १०९७३ | १४२११ |
| १६ | सांगली | ० | ३३१० | ३३१० |
| १७ | रत्नागिरी | १९३९ | २३६३ | ४३०२ |
| १८ | सिंधुदूर्ग | ५९५ | ८०७ | १४०२ |
| १९ | औरंगाबाद | ५२१८ | ११०३२ | १६२५० |
| २० | जालना | ७५९८ | ११९८६ | १९५८४ |
| २१ | बीड | ७१८६ | ७३२४ | १४५१० |
| २२ | परभणी | ३२७४ | २४०८ | ५६८२ |
| २३ | हिंगोली | १४८८ | २७०८ | ४१९६ |
| २४ | अमरावती | ३८१६ | ४३०१ | ८११७ |
| २५ | अकोला | ७५४१ | ७१ | ७६१२ |
| २६ | बुलढाणा | ८७३१ | १०८६७ | १९५९८ |
| २७ | यवतमाळ | ३१३९ | ३७६४ | ६९०३ |
| २८ | वाशिम | ६६३८ | ५२२७ | ११८६५ |
| २९ | नागपूर | ५३८७७ | ४३५६ | ५८२३३ |
| ३० | भंडारा | ९८१६ | ८४०९ | १८२२५ |
| ३१ | चंद्रपूर | ३२९३ | ५५८५ | ८८७८ |
| ३२ | वर्धा | ४५८४ | ७०६३ | ११६४७ |
| ३३ | गोंदिया | १८०१० | १९७५० | ३७७६० |
| ३४ | गडचिरोली | ३९८९ | ३०२१ | ७०१० |
| ३५ | लातूर | २४६८ | ५२२७ | ७६९५ |
| ३६ | उस्मानाबाद | १०७५ | २५१५ | ३५९० |
| ३७ | नांदेड | ३५०४ | ९२८१ | १२७८५ |
| एकूण महाराष्ट्र राज्य | | २४०००० | २६०००० | ५००००० |

(शरद गोसावी)

शिक्षण उपसंचालक (प्राथमिक)

शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे-१.

आर.टी.ई.२५ टक्के शैक्षणिक शुल्क
प्रतिपूर्तीच्या निधी वितरणाबाबत.

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

**शासन निर्णय क्रमांकः आरटीई-२०१९/प्र.क्र.१५०/एस.डी-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २० मार्च, २०२०

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८/०७/२०१९
२) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.२२/०१/२०२०, दि.१३/०३/२०२०
३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन परिपत्रक क्र.आरटीई-२०१८/प्र.क्र.२४५/एस.डी.१, दिनांक २१/०८/२०१९
४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.आरटीई-२०१९/प्र.क्र.१५०/एस.डी.-१, दि.२०/०९/२०१९
५) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.प्राशिसं/आरटीई-५२०/ २०१९/१८८, दि.१४/०१/२०२०

प्रस्तावना:-

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२(१) (c) नुसार खाजगी विनाअनुदानीत शाळांमध्ये प्रवेश स्तरावर २५% जागा वंचित व दुर्बल घटकातील मुलांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद असून या अधिनियमातील कलम १२(२) नुसार २५% प्रवेशित बालकांचे प्राथमिक शिक्षणाच्या शुल्काची प्रतिपूर्ती करण्याची तरतूद आहे. यानुषंगाने संदर्भ क्र.५ येथील पत्रान्वये शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निधी मागणी शासनास सादर केली आहे. सन २०१९-२० या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये सदर बाबीकरिता रुपये १०५ कोटी इतका निधी सुधारित अंदाजामध्ये अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. यापैकी अ.क्र.४ येथील शासन निर्णयान्वये रु.९० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित रु.१५ कोटी इतका निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याचा शासन निर्णय खालीलप्रमाणे आहे.

## शासन निर्णय:-

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १२(१)(c) नुसार खाजगी विनाअनुदानीत शाळांमध्ये वंचित व दुर्बल घटकातील विदयार्थ्यांसाठी राखीव असलेल्या २५% जागांवर प्रवेशित विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यासाठी रु.१५ कोटी (अक्षरी रुपये पंधरा कोटी फक्त) इतका निधी शिक्षण संचालक (प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सुपूर्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी जिल्हयांच्या मागणीच्या प्रमाणात निधी वितरित करावा. वितरित करण्यात आलेल्या निधीचा विनियोग हा सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाच्या ५० टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीकरिता करण्यात यावा.

३. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षातील शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती शासन परिपत्रक दिनांक २१ ऑगस्ट, २०१९ नुसार खालील बाबींची पडताळणी करुन देण्यात यावी.

- ज्या शाळा शिक्षण हक्क कायद्यातंर्गत २५ टक्के प्रवेश देत आहेत, त्या शाळांनी इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आकारण्यात येणाऱ्या फीचा तपशील **सरल** या पोर्टलवर अथवा RTE पोर्टलवर जाहीर केलेला असावा. ज्या शाळांची स्वत:ची वेबसाईट आहे त्यांनी फीचा तपशील त्यावरही जाहीर केलेला असावा.
- शाळेने शिक्षण हक्क अधिनियमांतर्गत आरटीईची मान्यता प्राप्त प्रमाणपत्र सोबत जोडावे.
- ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशातून प्रवेश मिळालेला आहे, असे विद्यार्थी त्याच शाळेत शिकत असल्याची खात्री **सरल** व RTE पोर्टल वरुन करण्यात यावी.
- सर्व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड नोंदवावे तसेच सरल प्रणालीवर देखील नोंदवावे.
- सवलतीच्या दरात शासकीय जमिन किंवा भाडेतत्वावरील शासकीय जमिनीचा लाभ शाळांनी घेतलेला नसावा याची खात्री करावी.

४. सोबतच्या प्रपत्र-अ मध्ये शाळांनी त्यांचा अहवाल सादर करावा. सदर अहवालाचे एकत्रिकरण जिल्हा स्तरावर करण्यात यावे व शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सर्व जिल्हयांचा एकत्रित अहवाल शासनास सादर करावा.

५. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

६. सदर शासन निर्णय नियोजन विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.३७/१४७१, दि.२८/०१/२०२०, वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र.१४३/२०/व्यय-५, दिनांक १३/०२/२०२० अन्चये दिलेल्या सहमतीस अनुसरुन तसेच वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०८/०७/२०१९, दि.२२/०१/२०२० व दि.१३/०३/२०२० रोजीच्या परिपत्रकास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील अटींची पूर्तता होत आहे. तसेच परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ९ मधील १ ते ४ व ९ मध्ये नमूद अटींची पूर्तता होत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ९ मधील ५ ते ८ व १० मधील बाब या आदेशासाठी लागू नाही.

७. सदर खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०८/०७/२०१९, दि.२२/०१/२०२० व दि.१३/०३/२०२० रोजीच्या परिपत्रकातील सूचनानुसार करण्यात यावा. यासाठी शिक्षण संचालक (प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सर्व, विभागीय शिक्षण उप संचालक, मुंबई विभाग, मुंबई यांचे कार्यालयातील लेखा अधिकारी यांना “आहरण व संवितरण अधिकारी” तर आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना “नियंत्रक अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर निधी वितरणाचे उपयोगिता प्रमाणपत्र शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनी आठ दिवसात शासनास सादर करावे.

८. सन २०१९-२० या चालू आर्थिक वर्षाकरिता "मागणी क्रमांक: ई-२, २२०२ - सर्वसाधारण शिक्षण- (०१) प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना सहाय्य (०१) (१९) २५% विदयार्थी कोटा प्रवेशातंर्गत शाळांना करावयाची प्रतिपूर्ती (२२०२ H८७५), ३१ सहायक अनुदाने" या

लेखाशीर्षांतर्गत रुपये १०५ कोटी इतकी तरतूद सुधारित अंदाजामध्ये अर्थसंकल्पित करण्यात आली आहे. सदर तरतूदीमधुन यावर होणारा खर्च भागविण्यात यावा.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२००३२०१४४०४७७८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gaikwad Santosh Umeshrao

Digitally signed by Gaikwad Santosh Umeshrao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education & Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1d60828c41033ab1da6d64ef17879745d578b334c05c1e8151ef933f134060bc, serialNumber=bc8833f9e213a7e4dfb9d2b071c9202ea52a04054e53b0c1bbf9e50c90a2cf5c, cn=Gaikwad Santosh Umeshrao
Date: 2020.03.20 14:42:13 +05'30'

(संतोष गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
४. मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
५. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
६. शिक्षण संचालक (प्राथ.), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
८. महालेखापाल (लेखा परीक्षा) १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
९. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई - ६३
१०. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
११. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सर्व
१२. सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग)
१३. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१४. वित्त विभाग (व्यय-५/अर्थ-८), मंत्रालय, मुंबई
१५. नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई
१६. अर्थसंकल्प कार्यासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. निवड नस्ती (एस.डी.१).

**प्रपत्र-अ**

**आरटीई अंतर्गत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा शाळानिहाय तपशील**

| वर्ग | | ७५ टक्के (सर्वसाधारण) प्रवेशित विद्यार्थी संख्या | आरटीई २५ टक्के अंतर्गत प्रवेशित विद्यार्थी संख्या | प्रत्येक वर्गनिहाय वार्षिक शाळेची फी |
|---|---|---|---|---|
| इयत्ता १ ली. | २०१७-१८ | | | |
| | २०१८-१९ | | | |
| | २०१९-२० | | | |
| इयत्ता २ री | २०१७-१८ | | | |
| | २०१८-१९ | | | |
| | २०१९-२० | | | |
| इयत्ता ३ री | २०१७-१८ | | | |
| | २०१८-१९ | | | |
| | २०१९-२० | | | |
| इयत्ता ४ थी | २०१७-१८ | | | |
| | २०१८-१९ | | | |
| | २०१९-२० | | | |
| इयत्ता ५ वी | २०१७-१८ | | | |
| | २०१८-१९ | | | |
| | २०१९-२० | | | |
| इयत्ता ६ वी | २०१७-१८ | | | |
| | २०१८-१९ | | | |
| | २०१९-२० | | | |
| इयत्ता ७ वी | २०१७-१८ | | | |
| | २०१८-१९ | | | |
| | २०१९-२० | | | |
| इयत्ता ८ वी | २०१७-१८ | | | |
| | २०१८-१९ | | | |
| | २०१९-२० | | | |

३२३


महाराष्ट्र शासन
प्राथमिक शिक्षण संचालनालय
डॉ.ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत,पुणे-४११००१.
दुरध्वनी : (०२०) २६१२५६९२/९३ ई-मेल depmah2@gmail.com


जा.क्र./प्राशिसं/प्रतिपूर्ती/आरटीई-५२०/२०१९/१५२६ दिनांक : .०३.२०२०.
ज्ञापन क्र. २. 23 MAR 2020

प्रति,

१) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई.
२) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सर्व.

**विषय : सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता २५ टक्के विद्यार्थी कोटा प्रवेशांतर्गत शाळांना करावयाची प्रतिपुर्ती (२२०२H८७५).**

संदर्भ : १) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१९/(३२/१९)/अर्थसंकल्प, दिनांक ०४/०४/२०१९
२) शासन निर्णय क्र. आरटीई-२०१८/प्र.क्र.१५०/एस.डी.-१, दिनांक २०/०९/२०१९.
३) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१९/(३२/१९)/अर्थसंकल्प, दिनांक २३/०९/२०१९
४) प्र. शिक्षण उपसंचालक (अंदाज व नियोजन), आयुक्त शिक्षण कार्यालय यांचे पत्र क्रमांक अंदाज-१८२/२०१९-२०/आरटीईतवि/५८४१, दिनांक ०५/१०/२०१९.
५) संचालनालयाचे ज्ञापन क्र. १ जा.क्र./प्राशिसं/प्रतिपूर्ती/आरटीई-५२०/२०१९/३७०२ दिनांक ०४/११/२०१९.
६) शासन निर्णय क्र. अनुवि ४९१९/(३२/१९)/अर्थसंकल्प, दिनांक २०/०३/२०२०.
७) प्र. शिक्षण उपसंचालक (अंदाज व नियोजन), आयुक्त शिक्षण कार्यालय यांचे पत्र क्रमांक अंदाज-१८२/२०१९-२०/तरतूदवित/१५१५, दिनांक २३/०३/२०१९.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये लेखासांकेतांक (२२०२H८७५)/३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीखाली २५ टक्के कोटा प्रवेशांतर्गत शाळांना करावयाची प्रतिपुर्ती केली जाते. सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये लेखासांकेतांक २२०२H८७५/३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीखाली रक्कम रु. १५०,००,०० हजार (रक्कम रूपये एकशे पन्नास कोटी फक्त) इतकी तरतूद मंजूर आहे. उपरोक्त संदर्भाधिन लेखासांकेतांक २२०२H८७५/३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबीखाली रक्कम रूपये १०५,०००० हजार (रक्कम रू. एकशे पाच कोटी फक्त) इतकी तरतूद संगणक वितरण प्रणालीवर उपलब्ध आहे.

**सोबत जोडलेल्या विवरणपत्रात उक्त शासन निर्णय व पत्र इ. अन्वये दिलेले आदेश व निर्देशानुसार बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत वंचित व आर्थिक दुर्बल घटकातील बालकांसाठी आरक्षित २५ टक्के प्रवेश सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाचे वर्षनिहाय शुल्क प्रतिपूर्तीसाठी रक्कम रूपये ९०,००,०० हजार (रक्कम रूपये नव्वद कोटी फक्त) संचालनालयाचे ज्ञापन क्र. १ नुसार दिनांक ०४/११/२०१९ रोजी वितरीत करण्यात आली आहे.**

उर्वरित रक्कम रू. १५,०००० हजार (रू. पंधरा कोटी फक्त) अनुदानामध्ये शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद सर्व यांनी केलेल्या आवश्यक अनुदानाच्या मागणीनुसार २५ टक्के विद्यार्थी कोटा प्रवेशांतर्गत शाळांना करावयाची प्रतिपूर्तीकरिता आवश्यक अनुदानाचा समावेश आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका, बृहन्मुंबई उत्तर विभाग, दक्षिण विभाग, पश्चिम विभाग यांचे २५ टक्के विद्यार्थी कोटा प्रवेशांतर्गत शाळांना करावयाची प्रतिपूर्ती करिताचे अनुदान विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी आहरित करून त्यांना वितरीत करावे. जिल्हानिहाय मंजूर केलेली रक्कम खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावी.

**मागणी क्र.ई-२, २२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०१ प्राथमिक शिक्षण, १०३ प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना सहाय्य (०१) (१९) २५ टक्के विद्यार्थी कोटा प्रवेशांतर्गत शाळांना करावयाची प्रतिपूर्ती (२२०२H८७५) सहाय्यक अनुदाने.**

निकषपात्र सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी प्रतिपूर्ती रक्कम दिनांक १० ऑक्टोंबर, २०११ च्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २०११ मधील भाग ४ मधील नियम ८ चे उपनियम २ नुसार शाळांचे आरटीई अंतर्गत आरक्षित २५ टक्के प्रवेश प्रतिपूर्तीसाठी स्वतंत्र ठेवावयाचे बँक खात्यामध्ये वर्ग (ट्रान्सफर) करण्यात यावी. प्रतिपूर्तीची रक्कम कोणत्याही परिस्थितीमध्ये संबंधित शाळेचे आरटीई प्रतिपूर्तीबाबतचे स्वतंत्र बँक खाती वर्ग करावी, इतर कोणत्याही बँक खाती वर्ग करण्यात येवू नये.

आरटीई अंतर्गत आरक्षित २५ टक्के प्रवेश प्रतिपूर्ती रक्कम शाळेचे स्वतंत्र बँक खाती वर्ग करतांना दिनांक २४ मे, २०१२ च्या शासन अधिसूचनेतील परिच्छेद ७ व दिनांक १५ मार्च, २०१३ च्या शासन अधिसूचनेतील परिच्छेद १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विहीत कार्यपध्दती, अटी-शर्ती व निकषांची खातरजमा करून प्रतिपूर्ती रक्कम वर्ग करण्यात यावी. तसेच, संबंधित शाळेने आकारलेले प्रती विद्यार्थी प्रती वर्ष शुल्क व शासन निर्णयानुसार मंजूर प्रतिपूर्तीचा दर (कमाल मर्यादा) यापैकी जी रक्कम कमी असेल त्याप्रमाणे प्रतिपूर्ती रक्कम अदा करण्याची कार्यवाही करावी. सदर खर्चाची उपयोगीता प्रमाणपत्रे संचालनालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, अधिनियम २०११ व संदर्भीय शासन निर्णय/अधिसूचना तसेच प्रस्तूत विषयी शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित अधिसूचना व शासन निर्णयातील अटी-शर्ती, निर्देश व १.११.२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकातील तरतूदीं खालील बाबी अनुदान वितरण करतांना विचारात घ्याव्यात.

८) ज्या शाळांना शासनाने सवलतीच्या दरात शासकीय जमिनी दिल्या आहेत किंवा सवलतीच्या दरात भाडेतत्वावर जमिनी दिल्या आहेत अशा शाळांची नोंद घ्यावी व अशा शाळांना आरटीई २५ टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीचा लाभ देवू नये.

९) शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीचा दावा सादर करणाऱ्या शाळांतील आरटीई अंतर्गत शिक्षण घेत असलेल्या तसेच इतर सर्व विद्यार्थ्यांची सरल प्रणालीमध्ये नोंद असल्याची खातरजमा करण्यात यावी.

१०) ज्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रतिपूर्ती करावयाची आहे त्या सर्व विद्यार्थ्यांचे आधार क्रमांक असणे आवश्यक आहे.

११) शाळांनी आकारलेली फी ही त्यांच्या शैक्षणिक पोर्टलवर शिवाय आरटीई पोर्टल अथवा सरल पोर्टलवर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. शाळांच्या स्वतःच्या वेबसाईटवर फी जाहिर नसल्यास त्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करू नये.

१२) शाळांनी निश्चित करून आकारलेल्या फी संदर्भात EPTA ठरावाची प्रत तपासावी.

१३) शाळांना प्रथम मान्यता, आरटीई मान्यता प्राप्त आहे का याची तपासणी करावी.

१४) शैक्षणिक वर्ष २०१७-१८ व २०१८-१९ या वर्षात झालेले आरटीई २५ टक्के प्रवेश व उर्वरित सर्वसाधारण प्रवर्गात झालेले ७५ टक्के प्रवेश याची माहिती तयार करावी व आरटीईमध्ये झालेले प्रवेश सर्वसाधारण प्रवेशाच्या १/३ पेक्षा कमी किंवा जास्त प्रवेश झाले आहेत याची माहिती संचालनालयास सादर करावी.

तसेच शिक्षण हक्क अधिनियमांतर्गत ज्या शाळांनी २५ टक्के अंतर्गत प्रवेश दिलेले आहेत या शाळांच्या सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरिता शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती संदर्भात शासनाच्या दिनांक २१/०८/२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये पुढील सूचना देण्यात आलेल्या आहेत.

१. आरटीई २५ टक्के प्रवेशाच्या प्रतिपूर्तीच्या रकमा संबंधित शाळांना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मंजुरीनंतरच वितरित करण्यात याव्यात.

२. मुंबई महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या स्तरावरून मुंबई म.न.पा. क्षेत्रातील राज्य मंडळांशी संलग्नित शाळांच्या प्रतिपूर्तीची देयके तर विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांनी मुंबई म.न.पा. क्षेत्रातील अन्य मंडळांशी संलग्नित शाळांच्या प्रतिपूर्तीची देयके अदा करावीत.

३. ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्यापासून सन २०१७-१८ पर्यंतचे ज्या शाळांचे प्रतिपूर्तीचे प्रस्ताव प्रलंबित आहेत अशा शाळांच्या प्रलंबित प्रतिपूर्तीच्या रकमा त्या-त्या वर्षी निश्चित केलेल्या दराप्रमाणे अदा करण्यात याव्यात.

४. सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाची शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती रु. १७,६७०/- या दराप्रमाणे मंजूर करण्यात यावी.

५. सन २०१८-१९ मधील शाळांच्या प्रतिपूर्ती रकमेपैकी ५० टक्के प्रतिपूर्तीची रक्कम निश्चित दराप्रमाणे शाळांना अदा करण्यात यावी.

६. सन २०१८-१९ मधील ५० टक्के रक्कम अदा करतांना खालील बाबींची पडताळणी करण्यात यावी.

- ज्या शाळा शिक्षण हक्क कायद्यांतर्गत २५ टक्के प्रवेश देत आहेत, त्या शाळांनी इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आकारण्यात येणाऱ्या फीचा तपशील सरल या पोर्टलवर अथवा आरटीई पोर्टलवर जाहीर केलेली असावी. ज्या शाळांची स्वत:ची वेबसाईट आहे त्यांनी फीचा तपशील त्यावरही जाहीर करावा.
- शाळेने शिक्षण हक्क अधिनियमांतर्गत आरटीईची मान्यता प्रमाणपत्र प्राप्त केलेले असावे.
- प्रतिपूर्ती संदर्भात शाळांनी प्रस्ताव दाखल करण्याचे निश्चित वेळापत्रक जिल्हास्तरावरुन तयार करण्यात यावे व त्यानुषंगाने सूचना सर्व संबंधित मुख्याध्यापकांना द्याव्यात.
- ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशातून प्रवेश मिळालेला आहे, असे विद्यार्थी त्याच शाळेत शिकत असल्याची खात्री सरल व आरटीई पोर्टल याचा उपयोग करून शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या स्तरावर करावी. या संदर्भातील माहिती शिक्षणाधिकारी यांनी त्यांच्या लॉगिनमधून तपासावी.

ज्या शैक्षणिक वर्षासाठी अनुदान मान्य आहे त्या शैक्षणिक वर्षाचे अनुदान वितरीत केल्यानंतर प्रतिपूर्तीचे अनुदान ज्या जिल्ह्याकडे शिल्लक आहे त्यांनी उपरोक्त बाबी विचारात घेवून थकीत अनुदान वितरीत करावे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, अधिनियम २०११ व संदर्भीय शासन निर्णय/अधिसूचना तसेच प्रस्तूत विषयी शासनामार्फत वेळोवेळी निर्गमित अधिसूचना व शासन निर्णयातील अटी-शर्ती, निर्देश व तरतूदींच्या अधीन राहूनच आरटीई अंतर्गतचे २५ टक्के प्रवेशांचे प्रतिपूर्ती करण्याबाबतची कार्यवाही करावी.

अधिनियमातील तरतूदीनुसार प्रतिपूर्ती बाबतची जबाबदारी आपली असल्याने याबाबत कोणत्याही प्रकारचा विलंब होणार नाही याची आपण दक्षता घ्यावी. तसेच विषयांकीत प्रकरणी अनुदानाचा मासिक खर्च अहवाल, उपयोगीता प्रमाणपत्र व वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास ई-मेलव्दारे सादर करावा व त्याची एक प्रत टपालाद्वारे पाठवावी.

सोबत जोडलेल्या विवरणपत्रात नमूद केलेल्या अनुदानाची रक्कम संबंधित खालील नमूद केलेल्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

ज्या उद्देशासाठी निधि/अनुदान मंजूर आहे त्या व्यतीरिक्त इतर उद्देशासाठी खर्च करता येणार नाही.

१. सदर खर्चाचा प्रगती अहवाल मासिक विवरण पत्रानुसार संबंधित अधिकाऱ्याने दरमहा १० तारखेपर्यंत सादर करावा.

२. तरतूद वितरण करतांना शासन हिश्याच्या मर्यादेत तरतूदी वितरीत कराव्यात. कोणत्याही परिस्थितीत जिल्हा परिषद फंडात आवश्यक रक्कम शिल्लक राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

३. अनुदान निर्धारणाअभावी तरतूद जास्त गेल्यास अथवा फंडात राहिल्यास तसेच त्यानुषंगाने लेखा आक्षेप नोंदविला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

४. मागणी नोंदवितांना उपरोक्त सूचना लक्षात घेवून तसेच आवश्यक तेवढयाच रकमेची मागणी नोंदवावी. पुढील अनुदानासाठीची मागणी पुरेशा कालावधीपूर्वी या संचालनालयाकडे सादर करणे आवश्यक आहे.

५. शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती ईलेक्ट्रॉनिक्स क्लिअरन्स सिस्टम (**ECS**) नेच अदा करण्यात यावी.

(ज्ञानेश्वर पारधी)
लेखाधिकारी,
प्राथमिक शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :**

१) मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

२) मा. शिक्षण उपसंचालक (अंदाज व नियोजन), आयुक्त शिक्षण कार्यालय, पुणे.

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :**

१. कोषागार अधिकारी, सर्व जिल्हे.

२. अधिदान व लेखाधिकारी, प्रशासकीय इमारत, वांद्रा, मुंबई.

३. मा. महालेखापाल, महाराष्ट्र मुंबई-१/नागपूर-२.

## ज्ञापन क्र. २

### सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता २५ टक्के विद्यार्थी कोटा प्रवेशांतर्गत शाळांना करावयाची प्रतिपुर्ती (२२०२H ८७५).

(रक्कम रु. हजारात)

| अ.क्र. | जिल्हा | दिनांक ०४/११/२०१९ रोजीचे ज्ञापन क्र. १ द्वारे वितरीत तरतूद | या ज्ञापनाव्दारे वितरीत तरतूद | एकुण वितरीत तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | विभागीय शिक्षण उपसंचालक,मुंबई | ३९४३३ | ८९९० | ४८४२३ |
| २ | अहमदनगर | ३९४१५ | ४८०४ | ४४२१९ |
| ३ | अकोला | २१०६० | ५६१८ | २६६७८ |
| ४ | अमरावती | २४६२९ | १२१२० | ३६७४९ |
| ५ | औरंगाबाद | ५३१३८ | ४६५१ | ५७७८९ |
| ६ | बीड | २६२१६ | २२५७ | २८४७३ |
| ७ | भंडारा | १५५३७ | २५१८ | १८०५५ |
| ८ | बुलडाणा | १७०५३ | २७६४ | १९८१७ |
| ९ | चंद्रपुर | १५६८० | २५४१ | १८२२१ |
| १० | धुळे | ९९७६ | १३८६ | ११३६२ |
| ११ | गडचिरोली | ६०७८ | ५९२८ | १२००६ |
| १२ | गोंदिया | २५९९१ | १३२० | २७३११ |
| १३ | हिंगोली | ५७८९ | ८५७६ | १४३६५ |
| १४ | जळगांव | ३७६०१ | ३२१२ | ४०८१३ |
| १५ | जालना | ३९२३२ | २५६१ | ४१७९३ |
| १६ | कोल्हापूर | २०८१० | १३२ | २०९४२ |
| १७ | लातूर | २०९५३ | ३२०६ | २४१५९ |
| १८ | नागपूर | ९११६८ | १५२२२ | १०६३९० |
| १९ | नांदेड | ३१४२० | ७१६७ | ३८५८७ |
| २० | नंदूरबार | ११२९ | ४१५ | १५४४ |
| २१ | नाशिक | ४००७२ | ६३७० | ४६४४२ |
| २२ | उस्मानाबाद | ६२२३ | ६६० | ६८८३ |
| २३ | पालघर | ५७८९ | १३२० | ७१०९ |
| २४ | परभणी | ११३४९ | १८३९ | १३१८८ |
| २५ | पुणे | ११९०४६ ✓ | २७१५३ ✓ | १४६१९९ ✓ |
| २६ | रायगड | ३०६१४ | २४२७ | ३३०४१ |
| २७ | रत्नागिरी | ५७३३ | ४५३ | ६१८६ |
| २८ | सांगली | १०६९४ | २४३९ | १३१३३ |
| २९ | सातारा | ३२०३० | २१४६ | ३४१७६ |
| ३० | सोलापूर | १३८६३ | २१८२ | १६०४५ |
| ३१ | सिंधुदूर्ग | ० | ० | ० |
| ३२ | ठाणे | ४४१०६ | ० | ४४१०६ |
| ३३ | वर्धा | १५३५८ | २४१९ | १७७७७ |
| ३४ | वाशिम | १०१३० | २३११ | १२४४१ |
| ३५ | यवतमाळ | १२६८५ | २८९३ | १५५७८ |
| | एकूण महाराष्ट्र राज्य | ९००००० | १५०००० | १०५०००० |

(ज्ञानेश्वर पारधी)
लेखाधिकारी
प्राथमिक शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे - १

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे